पृ.क.विकाअ/आस्था/२०१६/3893
दिनांक 31 DEC 2016

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्रमांक-मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२,दिनांक ०३/१२/२०१६.
२) संचालनालयाचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१६/शा२९३२९, दिनांक-२९/१२/२०१६..

प्रति,

विभागातील सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित पदवि/पदविका संस्था.

दि.०१ जानेवारी २०१७ ते दि.१५ जानेवारी २०१७ या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणुन साजरा करण्याचे घोषित केलेले आहे. शासन परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करुन मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात यावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत:- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

Gmail — roamravati amravati <roamravati.dte@gmail.com>

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत

1 message

**Desk16 DTE** <desk16.dte@gmail.com> Fri, Dec 30, 2016 at 11:54 AM

To: ro Techinical Education Regional office Nagpur <ronagpur.dte@gmail.com>, ropune Techinical Education Regional Office Pune <ropune.dte@gmail.com>, Joint Director <romumbai.dte@gmail.com>, RO NASHIK <ronashik.dte@gmail.com>, roamravati amravati <roamravati.dte@gmail.com>, RO Aurangabad <roaurangabad.dte@gmail.com>, Dilip Bhadane <ronashik.estt@gmail.com>, secretary <secretary@msbte.com>

--
श्रीमती सु. ग. रणदिवे,
सहाय्यक संचालक, (का. क्र. १६)
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

**celebration of marathi bhasha pandharvada.pdf**
160K

आंट-शा

30.12

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती
जावक क्र. 7766 दिनांक 30-12-16

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org


ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१६/शा२९३२९

दिनांक : २९/१२/२०१६

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : दिनांक १ जानेवारी, २०१७ ते दि.१५ जानेवारी, २०१७ या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.**

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दि.१ जानेवारी ते दिनांक १५ जानेवारी, हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय मराठी भाषा विभागाच्या परिपत्रक क्रमांक मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दिनांक २२.७.२०१५ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामध्ये मराठी भाषा विभागाच्या परिपत्रक क्रमांक मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२, दिनांक ३.१२.२०१६ (सोबत प्रत जोडत आहे) च्या शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

( सु.भा. शिरभाते )
सहा. संचालक (तां.),
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत : कार्यासन क्रमांक २, २अ व १०, मुख्य कार्यालय, मुंबई**

१०६१६
१५/१२/१६

सं.क्र. ६९६/१६/समन्वय
१६/१२/१६

दिनांक १ जानेवारी ते दिनांक १५ जानेवारी,२०१७ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

14 DEC 2016

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः- मभापं-२०१६/प्र.क्र.११८/भाषा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०३ डिसेंबर, २०१६

समन्वय
१३/१२/२०१६

<u>वाचा</u>:- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक-मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२, दिनांक २२ जुलै,२०१५.

## शासन परिपत्रक

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय संदर्भाधीन दिनांक २२ जुलै,२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/मंडळे/सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी सर्व संस्थांनी दिनांक १ जानेवारी,२०१७ ते १५ जानेवारी, २०१७ या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याबाबत पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) राज्यामध्ये मराठी भाषेचा राजभाषा म्हणून सार्वत्रिक वापर करण्याच्या दृष्टीने सदर पंधरवड्यात सर्व संस्था / कार्यालये यांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे. यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालये/ महामंडळे / स्थानिक संस्था, राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / महामंडळे / उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका यांनी सक्रीय सहभाग घ्यावा.

(२) सर्व मंत्रालयीन विभागांनी आपले कार्यालय व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याबाबत सविस्तर आदेश द्यावेत.

(३) सर्व शाळा व महाविद्यालये यांनी त्यांच्या स्तरावर सदर पंधरवड्यात भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद / व्याख्याने / स्पर्धा / कार्यशाळा / शिबिर यांचे औचित्यपूर्ण आयोजन करावे.

(४) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने संबंधित तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादीचे आयोजन करावे.